epaper.mahaenews.com
23 Sep 2025 - Page 9

विद्यार्थ्यांनी घेतले सायबर सुरक्षेचे धडे!

शिक्षण विश्व: फिशिंगपासून पासवर्डपर्यंत उपक्रमातून सायबर सुरक्षा मार्गदर्शन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

आजच्या डिजिटल युगात इंटरनेटचा वापर अपरिहार्य बाब बनली आहे. मोबाईल, संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षणासोबतच मनोरंजन, संवाद साधणे इत्यादी गोष्टी होत असतात. परंतु याचाच गैरफायदा घेऊन सायबर गुन्हेगार आपल्याला जाळ्यात ओढू शकतात, म्हणूनच सायबर सुरक्षा याविषयी जागृती करणे आवश्यक आहे.

एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी व क्विक हील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" हा उपक्रम २ ऑगस्ट २०२५ पासून सुरू करण्यात आला असून, विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रभावी पावले उचलली जात आहेत. या अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी शिवप्रसाद जाधव आणि आयुष इचे यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड झाली असून, त्यांनी परिसरातील विविध शाळांमध्ये जाऊन फिशिंग, ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियावरील वैयक्तिक माहितीचा गैरवापर, सुरक्षित पासवर्ड पद्धती व इंटरनेटचा जबाबदार वापर यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सादरीकरण व संवादात्मक सत्रे घेतली आहेत. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक अमित ताळे (एमआयटी कॉलेज) व अजय शिरके (क्विक हील फाउंडेशन) यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. आतापर्यंत जि.परिषद प्राथमिक शाळा चिंबळी, शारदाबाई पवार विद्यालय आंबेगव्हाण, श्री ज्ञान साई शिक्षण प्रसारक मंडळ आळंदी देवाची, जि. परिषद प्राथमिक शाळा खेड, ज्ञानभक्ति इंटरनॅशनल स्कूल डुडूळगाव,मोशन क्लासेस मोशी. तसेच परिसरातील आणखी अनेक शाळांमध्ये कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. या कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर कसा करावा, फिशिंग म्हणजे काय, मजबूत पासवर्ड कसा तयार करावा, ऑनलाइन फसवणुकीपासून कसे वाचावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

9:47 AM